महा पारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

सूचना का अधिकार RIGHT TO INFORMATION

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित,
CIN No. U40109MH2005SGC153646


प्रेषक :
कार्यालयाचे नांव : कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग, कराड
कार्यालयीन पत्ता : प्रशासकीय इमारत, तळमजला विजयनगर कराड
पो.सुपने ता.कराड जि.सातारा पिन.नं.४१५११४
दुरध्वनी : का. ०२१६४ २५५१९९ वै. ०२१६४ २५५०४७
E mail ee3110@mahatransco.in Web Site : www.mahatransco.in


जा.क्र. काअ/अउदा संवसु विभाग/कराड/मासं/U/ No - 0164 दि. 23 FEB 2026

## 'विजतंत्री' शिकाऊ उमेदवार भरती प्रक्रिया जाहीर सुचना

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, अऊदा संवसु विभाग, कराड अंतर्गत शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ नुसार शिकाऊ उमेदवार म्हणून सत्र २०२६ करीता विजतंत्री (ELectrician) या ट्रेडमध्ये भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

सदर शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी शासनाच्या www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर अउदा संवसु विभाग, कराड च्या खालील आस्थापना रजिस्टर क्रमांकावर ऑनलाईन अर्ज सादर करणे गरजेचे आहे. ऑनलाईन अर्ज सादर करणेची अंतिम मुदत दि. १६.०३.२०२६ (२३.५९) पर्यंत राहील. त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा शिकाऊ उमेदवार भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. विजतंत्री (ELectrician) शिकाऊ उमेदवारांचा प्रशिक्षण कालावधी हा अधिनियमानुसार ०१ वर्षाचा राहील. ऑनलाईन अर्जासाठी आवश्यक माहिती खालील आस्थापनेच्या नावे नोंदणी क्रमांकावरती करणेत यावी.

| आस्थापनेचा नोंदणी क्र.(Registration) | ट्रेड (Trade) | एकूण |
|---|---|---|
| Location : EHV O&M DIVISION, KARAD E03212700871 | वीजतंत्री (Electrician) | एकूण जागा – ३९ |

१. शैक्षणिक अर्हता – महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे व राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT) नवी दिल्ली मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन वीजतंत्री या व्यवसाय परीक्षेत उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
२. विद्यावेतन शासनाच्या नियमाप्रमाणे लागु राहील.
३. पदसंख्या कमी किंवा जास्त करण्याचा व भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले सर्व निर्णय घेण्याचे अधिकार व्यवस्थापनेकडे राखीव असतील व सदरचे निर्णय उमेदवारास कळविणे व्यवस्थापनेस बंधनकारक राहणार नाही. भरती प्रक्रियेचे ठिकाण अउदा संवसु विभाग, कराड हे राहील.
४. शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी आरक्षण शासनाच्या विविध नियमानुसार लागु राहील.
५. ऑनलाईन अर्ज सादर करताना एस.एस.सी. उत्तीर्ण गुणपत्रिका व आय.टी.आय उत्तीर्ण गुणपत्रिका यामध्ये नमुद केलेले नाव व आधारकार्डवर नमुद केलेले नाव सुसंगत असावे.
६. एस.एस.सी. उत्तीर्ण गुणपत्रिका / प्रमाणपत्र व आय.टी.आय उत्तीर्ण गुणपत्रक / प्रमाणपत्र (चारही सेमिस्टरची) साक्षांकित प्रत ऑनलाईन अर्जामध्ये अपलोड करणे आवश्यक राहील.

..कृपया मागे पहा

...मागील पानावरून पुढे

७. शिकाऊ उमेदवाराची सही, पालकांची सही, जातीचा प्रवर्ग, जन्मतारीख, एस.एस.सी. गुण, आय.टी.आय गुण ही माहिती अचूक भरण्यात यावी सदर माहिती उपलब्ध न झाल्यास उमेदवाराचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.

८. शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिकाऱ्यांकडुन दबाव आणल्यास संबंधीत उमेदवाराची उमेदवारी रद्द करणेत येईल, याची नोंद घ्यावी.

९. शिकाऊ उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करताना पोर्टलवर फोटो, मुळ प्रमाणपत्राची सुस्पष्ट स्कॅन कॉपी जोडून योग्य रितीने ऑनलाईन अर्ज सादर करावा. फोटो अथवा मुळ प्रमाणपत्र सुस्पष्ट नसेल तर अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१०. वयोमर्यादा १८ ते ३० वर्षे (मागास प्रवर्गाकरीता ०५ वर्ष शिथिलक्षम)

११. ऑनलाईन अर्ज सादर करताना उमेदवाराने सद्य:स्थितीत कार्यान्वित असणारा ई मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक नमुद करणे आवश्यक आहे. ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक कार्यान्वित नसल्यामुळे संपर्क करणे शक्य झाले नाही तर त्याची पुर्ण जबाबदारी उमेदवारावर राहील.

१२. दि.१६.०३.२०२६ (२४.००) नंतर ऑनलाईन नोंदणी केलेल्या उमेदवारांचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

१३. आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांना ऑनलाईन अर्जासोबत जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच या कार्यालयाने मागणी केल्यास शासकीय नियमाप्रमाणे आरक्षणासंबंधीत कागदपत्रे सादर करणे उमेदवारास बंधनकारक राहील.

१४. शिकाऊ उमेदवारीचा प्रशिक्षण कालावधी पुर्ण केल्यामुळे कंपनीमध्ये नोकरी मिळवण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

१५. निवड केलेल्या उमेदवारांनी जिल्हा शल्यचिकित्सालय, सातारा यांचेकडून दाखला देणे बंधनकारक आहे.

१६. कागदपत्रे तपासणी किंवा शिकाऊ उमेदवार म्हणून हजर होणे करीता कोणत्याही रक्कमेची पूर्तता असणार नाही.

१७. प्रशिक्षण कालावधीत कोणतीही निवास व्यवस्था कंपनीकडून केली जाणार नाही.

१८. सदर एस.एस.सी व आय.टी.आय या गुणांना अनुक्रमे ५० व ५० टक्के गुणोत्तर देवून त्यानुसार गुणवत्ता यादी तयार करणेत येईल. व त्यानुसार शासकीय व सामाजिक आरक्षणाचा लाभ देणेस हे कार्यालय बांधील असेल.

१९. आय.टी.आय विजतंत्री उमेदवार यांनीच अर्ज करावा.
(डिप्लोमा/व्होकेशनल/ वायरमन कोर्स यांनी अर्ज भरू नये)

२०. सदर भरती प्रक्रियेमध्ये सातारा जिल्हयातील उमेदवारांना प्राधान्य देणेत येईल.

२१. कागदपत्रे पडताळणी केल्यानंतर पुन:श्च गुणवत्ता यादी लावणेत येईल. त्यामध्ये जे पात्र उमेदवार ठरतील त्यांना शिकाऊ उमेदवारी करीता नियुक्ती देणेत येईल.

२२. आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS) व सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्ग (SEBC) या प्रवर्गाच्या उमेदवारांकडे जाहिरातीच्या दिनांकापूर्वीचे प्रमाणपत्र असणे आवश्यक असेल व या प्रवर्गाची निवड व प्रतिक्षायादी याच प्रवर्गात असेल.

GHHuse

गजानन.बा.हुसे (प्रभारी)
कार्यकारी अभियंता
अऊदा संवसु विभाग, कराड

# अउदा संवसु विभाग, कराड

## शिकाउ उमेदवारी करीता आरक्षण तक्ता

| अजा | अज | विजा -अ | भज -ब | भज -क | भज -ड | विमाप्र | इमाव | आ. दु.घ EWS | सा.शै. मा.प्र SEBC | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३% | ७% | ३% | २.५% | ३.५% | २% | २% | १९% | १०% | १०% | २८% | १००% |
| ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ७ | ४ | ४ | ११ | ३९ |

गजानन.वा.हुरे (प्रभारी)
कार्यकारी अभियंता
अउदा संवसु विभाग, कराड